REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# "स्त्री भ्रुणहत्या : एक राष्ट्रीय सामाजीक समस्या"

डॉ. प्रल्हाद आश्रुजी गोरे
कै. बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय हिंगोली

**प्रस्तावनाः—**




भारतीय समाजामध्ये स्त्री—पुरूषांमध्ये जो असमतोल निर्माण झाला आहे त्याचे मुख्य कारण स्त्री भ्रुण हत्या होय. स्त्री भ्रुण हत्या म्हणजेच मुलीचा जन्म होण्याआधीच आईच्या गर्भामध्ये तिची हत्या करणे. भारतीय संस्कृती ही प्राचीन संस्कृती म्हणून ओळखली जाते. या संस्कृतीतील मुल्ये, नियमने कुटूंबव्यवस्था आणि प्राचीन काळापासून स्त्रियांना मिळणारा मानसन्मान हा पाश्चात्य राष्ट्राचा कुतुहलाचा कायमचा विषय ठरलेला आहे. समाजरथाची दोन चाके म्हणजे स्त्री व पुरूष पण यापैकी एक चाक गळून पडले तर एका चाकाचा काय उपयोग? म्हणून समाजाच्या जडणघडणीसाठी स्त्री—पुरूषाचे प्रमाण समतोल राखने अतिशय गरजेचे आहे व तो निसर्गाचा नियम आहे. पण आज अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्त्रीभ्रुण हत्या मोठया प्रमाणात केली जात आहे. गरीब आणि त्याच बरोबर उच्च समजल्या जाणाऱ्या समाजात स्त्रीभ्रुण हत्येचे प्रमाण जास्त प्रमाणात असल्याचे दिसून येते.

स्त्री भ्रुण हत्या ही एक गंभीर सामाजीक व राष्ट्रीय समस्या बनली आहे. या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची खरी गरज आहे. आज गर्भलिंग तपासणी आणि स्त्रीभ्रुण गर्भपाताच्याही पुढे जावून पुत्राच्या प्राप्तीसाठी पुरूष लिंगाची निवड आणि निदान करण्यापर्यंत मजल गेली आहे. मुलाच्या प्राप्तीसाठी आज व्यक्तीची काहिही करण्याची तयारी असते. लिंग निदानामध्ये मुलगी असल्याचे समजताच भ्रुणहत्या केली जाते. त्यामुळे महिलांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. याबाबतीत पुरूषी वर्चस्व असलेला उत्तर—पश्चिम भारत कुप्रसिध्दच आहे. परंतु पंजाब व हरियाना सारख्या आर्थिकदृष्टया संपन्न राज्यामध्ये आणि दक्षिण भारताच्या तुलनेने अधिक साक्षर व जागृत राज्यामध्येही स्त्रीभ्रुण हत्यामुळे महिलांच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. देशाच्या फक्त केरळ राज्यामध्ये स्त्री—पुरूष लिंग प्रमाण काही दशकापर्यंत कायम अनुकुल आहे. 'युनिसेफ' च्या अहवालानुसार संपुर्ण जगामध्ये पुरूष महिला प्रमाण १००:१०५ आहे. जिथे भारतामध्ये हेच प्रमाण १००:९३ असे कमी आहे. युरोप आणि उत्तर अमेरिकेमध्ये हेच प्रमाण १.०५—१.०६ किंवा त्यापेक्षा जास्त आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १ अब्ज २१ कोटी झाली आहे. लोकसंख्येचा दर कमी करण्यासह साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याच्या सरकारने केलेल्या प्रयत्नांचे चांगले परिणाम दिसून आले आहेत. त्याचवेळी पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांच्या संख्येत असलेली घट हा सामाजीक चिंतेचा विषय बनला आहे.

गेल्या दहा वर्षातील वाढ १८.०१ कोटी एवढी आहे. नव्या जनगणनेचा हंगामी अहवाल प्रसिध्द झाला असून त्यात ही आकडेवारी समोर आली आहे. गेल्या नउ दशकात प्रथमच जन्मदरात लक्षणीय घट झाली आहे. जगाच्या तुलनेत भारताची लोकसंख्या १७.५ टक्के आहे. त्यात ६२.२७ कोटी पुरूष तर ५८.६५ कोटी स्त्रिया आहेत. सर्वाधीक लोकसंख्येत चीनचा पहिला क्रमांक

आहे. अमेरिका, इंडोनेशिया, ब्राझील, पाकिस्तान, बांग्लादेश आणि जपानची एकत्रीत लोकसंख्या भारताएवढी आहे.

भारतामध्ये १००० पुरूषमागे महिलांची संख्या ९४० इतकी आहे. खरे सांगायचे झाल्यास लिंग समानतेच्या दृष्टिने भारताची स्थिती शेजारच्या पाकिस्तानपेक्षाही वाईट आहे.

## मुलांच्या तुलनेत मुलींच्या संख्येत घटः

० ते ६ वर्षे वयोगटातील प्रती हजार पुरूष बालकांच्या तुलनेमध्ये स्त्री बालकांची संख्या सतत कमी होत चालली आहे. या वयोगटातील मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण हरियाणा आणि पंजाबमध्ये सर्वात कमी आहे. हरियाणात या वयोगटातील दर हजार मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण ८३० तर पुजाबमध्ये ८४६ आहे. हयातुनच महात्मा फुलेच्या या पुरोगामी महाराष्ट्रात दर हजार मुलांमागे फक्त ८८३ मुली आहेत. मिझोराममध्ये मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण सर्वात जास्त ९७१ एवढे आहे. मेघालयामध्ये ९७० तर हरियानातील झज्जरमध्ये ७७४ तर महेंद्रगढ जिल्हयात ७७८ एवढे म्हणजे सर्वात कमी आहे. हे कुर विक्राळ वास्तव मान खाली घालायला लावणार तर आहेच पण खाली झुकलेल्या मानेला लटकलेल्या डोक्यात विचारांचे काहुर उठवणारे आहे. हे मात्र खरे. कोणत्याही देशची विकास प्रक्रिया पुरूष आणि स्त्री अशा दोहोंवर अवलंबून असते. या अर्थाने स्त्रीभ्रुण हत्या एक गंभीर राष्ट्रीय समस्या बनली आहे.

## स्त्री भ्रुणहत्येचे कारकः

स्त्रीभ्रुणहत्येसाठी कोणतेही एक कारक नसून, अनेक कारणांच्या समुहाचा तो परीणाम आहे. स्त्रीभ्रुण हत्येसाठी कारक असलेल्या धार्मिक, सांस्कृतीक, आर्थिक व सामाजीक बाबी परस्पर संबंधीत आहेत. भारतीय समाजामध्ये मुलांकडे वंशाचा दिपक म्हणुन पाहिले जाते. या समजुतीमुळे मुलींकडे अक्षम्य दुर्लक्ष्य केले जाते. तसेच हुंडा पध्दत आजच्या काळातील सर्वात वाईट प्रथा आहे. काही अपवाद वगळता जवळजवळ सर्वच कुटुंबामध्ये अशा वाईट पध्दतीचा अवलंब केला जातो. या मध्ये मात्रात्मक फरक असला तरी गुणात्मक फरक अजिबात आढळत नाही. याशिवाय भारतीय समाजामध्ये मुलिला जन्माआधी आणि जन्मानंतरही मारूण टाकण्यासाठी अनिष्ठ प्रथा अनेक वर्षापासून चालत आलेली आहे. यामध्ये राजस्थानचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. राजस्थानमध्ये विशेषतः पश्चिम भागातील जिल्हयामध्ये दहा हजार लोकसंख्येच्या गावामध्ये युवक स्त्रियांची संख्या केवळ ५० आहे. १९९८ मध्ये राज्यातील देओरा गावामध्ये जेंव्हा ११५ वर्षानंतर एका मुलीच लग्न झाले, तेंव्हा गांव आंतरराष्ट्रीय चर्चेचा विषय बनले होते.

आजच्या काळात तांत्रीक विकास मोठया प्रमाणात झाला आह. आरोग्याच्या खात्रीसाठी नवनवीन तंत्रे विकसीत झाली आहेत. विशेषतः लहान बालकांच्या आरोग्याच्या खात्रीसंबंधी ॲम्नीओसेंटेसिस, बायोप्सी, अल्ट्रा साउंड स्कॅन, सोनोग्राफी अशी विविध तंत्रे विकसीत झाली आहेत. असे असले तरी, प्रत्यक्षात त्याचा दुरूपयोग लिंगनिदानासाठी केला जात असल्याचे चित्र सर्वदुर आढळते. त्यामुळे गर्भपाताचे प्रमाण वाढले आहे. परिणामी मुलिंच्या संख्येमध्ये घट होत चालली आहे.

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान आपल्या सर्वांचे आवडते दिवंगत जवाहरलाल नेहरू यांचे कपडे पॅरिसला धुवायला जात इतके ते श्रीमंत आणि सामर्थ्यवान होते. तरीही त्यांनी आपल्या वंशासाठी दिवा लावण्यासाठी धडपड केल्याचे दिसत नाही. त्यांना एकच कन्या होती मात्र त्या इंदिरा नामक कन्येने सर्व जगाला चकीत करणारे खंबीर नेतृत्व या देशाला दिले आणि त्याच नेहरू घराण्याचे वंशज आजही या देशाचे समर्थपणे नेतृत्व करीत आहेत. आजही समाजात मुलांसाठी दुसरे लग्न करणारे महाभाग दिसतात.

महाराष्ट्राचे शिल्पकार दिवंगत यशवंतराव चव्हाण यांना मुलबाळ नव्हते इतपत माहिती आपल्याला असते. पण मग त्यांनी दुसरी बायको का केली नाही याचा विचार आपल्या उन्मत मनाला का शिवत नाही? केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्याकडे भरपुर ऐपत आणि सत्ता, सामर्थ्य असुनही वंशासाठी दिवा लावण्यासाठी धडपड केली नाही आणि त्यांच्या एकुलत्या एक कन्याच आज समाजात तेजस्वीपणे चमकत आहेत. ही उदाहरणे डोळयासमोर आहेतच.

एकुण काय तर वंशासाठी दिवाच हवा पणती नको, या अनाठायी हव्यासापायी नादानपणे होत असलेल्या भ्रुणहत्या थांबलेल्या नाहीत तर येणारा काळ कोणालाच क्षमा करणार नाही. समाजातले मुलिंचे म्हणजेच स्त्रियांचे

प्रमाण असेच कमी होत गेले तर पुरूषांना बायका मिळवण्यासाठी लढाया कराव्या लागतील आणि पुन्हा एकदा समाजात अराजक माजेल आणि मानव प्राण्याची वाटचाल पुन्हा अश्मयुगाच्या दिशेने झाल्याशिवाय राहणार नाही.

सोनोग्राफी यंत्राचा दुरूपयोग करणाऱ्या लोकांवर कठोर कारवाई केली पाहिजे. सध्या महाराष्ट्रात यासंबंधीची मोहीम जोरात सुरू आहे. परळी येथील डॉ. मुंडे दाम्पत्यावर झालेल्या कारवाईमुळे असा दुर्व्यवहार करणाऱ्या लोकांवर चांगलाच वचक निर्माण झाला आहे. या मोहिमेला अधिक तीव्र व बळकट करण्यासाठी स्त्रीभ्रुण हत्येसंबंधीच्या कायद्याचे स्वरूप अधिक कडक करूण त्याची प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे. स्त्रीभ्रुणहत्येला नियंत्रणात आण्यासाठी गैरसरकारी संघटनेची भुमिका महत्वाची ठरते. यासंबंधी महत्वपुर्ण कार्य करीत असलेल्या सन फाउंडेशन व्हालंटरी हेल्थ असोशियशन ऑफ बेटी बचाओ अभियान, मराठवाडा विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, आरियन्टल वुमन ऑर्गनायझेशन लेक वाचवा ईत्यादीचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे.

अशा संघटनेला शाससनाने आवश्यक ती मदत पुरविली पाहिजे. स्त्रीभ्रुण हत्येमुळे स्त्र–पुरूष प्रमाणामध्ये निर्माण झाालेले अंतर कमी करण्यासठी राज्यस्तरावर काही प्रोत्साहनपर योजना राबविली पाहिजे. यासंबंधी हरियाणातील फत्तेहाबाद जिल्हयातील दुलात गावचा आदर्श सर्वांनी घेण्यासारख आाहे. यागावाने जानेवारी ते डिसेंबर २०१० याकाळात पुरूष–स्त्री प्रमाण १४:३४ असे साध्य केले. त्यासाठी हरियाणा सरकारने ५ लक्ष रूप्ये देवून दुलात गावचा गौरव केला होता. सर्वात महत्वाचे म्हणजे मुलिकडे पाहण्याच्या समाजाच्या दृष्टिकोणात बदल केला पाहिजे. त्यासाठी कोण्या एकाची नव्हे तर शासन, महिला आयोग, मानव अधिकार आयोग, गैर सरकारी संघटना, प्रसारमाध्यमे व नागरीक अशा सर्वच स्तरातून सकारात्मक प्रयत्नांची गरज आहे. गर्भपात केंद्रावर नियंत्रन ठेवणे व वेळोवेळी शासनाने सोनाग्रफी सेंटरसाठी शासनाने कायदा बनवणे आवश्यक आहे.

## मुल्यमापन:

समाजव्यवस्थेत अमुलाग्र स्वरूपाचे परिवर्तन झाालेले असतांनाही रूढीवादी विचारसरणीचा प्रभाव आजही समाजमनावर असलेला दिसतो. सद्यस्थितीत एकीकडे महिलांच्या सक्षमीकरणावर व्याख्याने, भाषने, परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा आयोजीत केली जाते. तर दुसरीकडे स्त्रीला गर्भातच मारूण टाकण्याचे प्रमाण वाढविले जात आहे.

राज्यघटनेने स्त्रियांना समान संधी उपलब्ध करूण दिली असली तरीही कायद्याला डावलून स्त्रिचा जगण्याचा हक्कच हिरावून घेतला जात आहे. या संदर्भात साळूंखे असे म्हणतात की, भारतीय राज्यघटनेने स्त्रियाला समानता देण्यासाठी केवळ समान संधी नव्हे तर विशेष संधी दिली पाहिजे अशी तरतुद केली. परंतु आज तिचा जगण्याचा हक्कच हिरावून घेतला जात आहे. गर्भजल परिक्षा या चाचणीचा उपयोग गर्भातील व्यंग शोधून काढण्याऐवजी लिंग परिक्षा व तत्पश्चात गर्भपात करण्यासाठी केला जात आहे. हा मानवी हक्कावरील हल्लाच आहे.

## संदर्भ ग्रंथ:

१. महिला सबलीकरण– डॉ. सौ. नंदिनी तडकलकर
२. स्त्री परिवर्तनाची आव्हाने– शुभांगी गोटे
३. स्त्री आणि कायदा– निलम गोरे
४. मनवी हक्क– प्रा. व्ही.बी.पाटील
५. आधुनिक विचार प्रवाह– माधवी कवि
६. लोकराज्य अंक सप्टेंबर २०११, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुबई पान क्र. ६
७. हिंदु संस्कृती आणि स्त्री, साळुंखे आ.ह. दुसरी आवृत्ती,१९९३ पान क्र. १०
८. नवदिप– पायघरे प्रकाशन, वर्धा
९. इंटानेट
10. वर्तमानपत्र